राज्यातील अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सकरिता (ANTF) एकूण ३४६ नवीन पदे निर्माण करण्यास व त्यानुषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांकः एपीओ-३१२३/प्र.क्र.८२/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई.
दिनांक : १९ मार्च, २०२५.

वाचा :-

१) भारत सरकार गृह विभाग, नवी दिल्ली यांचे आदेश क्रमांक१-१२०२३/०२/२०१७/ NCB II (VolI), दि.२५.०३.२०२२.

२) महानिदेशक, स्वापक नियंत्रण ब्युरो, नवी दिल्ली यांचे अ. शा. पत्र क्र.III/एन्कोर्ड-८ वी एपेक्स/समन्वय/२०२२/१०७, दि.१९.०१.२०२३.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्र: पोमसं/२६-ब/ Narcotics (ANTF)/१०९/२०२२, दिनांक ३०.०५.२०२३.

४) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक संकीर्ण-१०२२/प्र.क्र.१५३/विशा-३(अ), दिनांक ३१.०८.२०२३.

५) राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवार, दिनांक १८.०२.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे दि.२५.०२.२०२५ रोजीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने संदर्भाधीन क्र.१ व २ अन्वये प्रत्येक राज्यामध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्यात संदर्भाधीन क्र.४ च्या शासन निर्णयान्वये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन पोलीस महासंचालक कार्यालयाकडून संदर्भाधीन क्र.३ च्या पत्राद्वारे अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सकरिता मनुष्यबळ निर्माण करण्याची व त्याकरिता येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्यात शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ३१.०८.२०२३ द्वारे अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नियंत्रण आणि देखरेखीखाली विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अधिपत्याखाली स्थापन करण्यात आलेल्या अंमली पदार्थ विरोधी टास्क

फोर्सकरिता या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण ३१० नियमित पदे व **"परिशिष्ट-ब"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण ३६ पदे बाह्ययंत्रणेद्वारे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाची पुनर्रचना व विविध पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित केल्यामुळे त्या विभागातील अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन हे गृह विभागांतर्गत नव्याने निर्माण होणाऱ्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स मध्ये शैक्षणिक पात्रता व पदाची जबाबदारी व कर्तव्ये नुसार समायोजित करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत करण्यात येईल.

३. तसेच उक्त अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सकरिता नवीन पदे निर्माण करण्यास येणा-या रु.१९,२४,१८,३८०/- (रुपये एकोणीस कोटी चोवीस लाख अठरा हजार तीनशे ऐंशी) इतक्या आवर्ती खर्चास व रु.३,१२,९८,०००/- (रुपये तीन कोटी बारा लाख अठ्ठ्याण्णव हजार फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

४. उक्त शासन निर्णय हा मा. मंत्रिमंडळाच्या मंगळवार, दि.१८.०२.२०२५ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक ०९.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. उक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०३१९१६२३००९०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA
TANAJI
BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931
d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD51
4095659A6CDFAC856815518DCD188C23A,
cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.03.19 16:23:54 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), साप्रवि, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई.

८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक, (नि. व स.) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०.अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११.विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र.
१२.पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक, सर्व जिल्हे.
१३.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१४.महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१८. उप सचिव(पोल-३/पोल-४/विशा-३अ),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
१९.उप सचिव (अर्थसंकल्प-१), गृह विभाग,मंत्रालय, मुंबई.
२०.वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
२१.निवड नस्ती, पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एपीओ-३१२३/प्र.क्र.८२/पोल-३,
दिनांक : १९ मार्च, २०२५ चे सहपत्र.

## परिशिष्ट-अ (नियमित पदे)

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | आवश्यक पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | विशेष पोलीस महानिरीक्षक | S-३० - (रू.१४४२०० ते रू.२१८२००) | ०१ |
| २. | पोलीस उप महानिरीक्षक | S-२९ - (रू.१३११०० ते रू.२१६६००) | ०१ |
| ३. | पोलीस अधीक्षक | S- २३ - (रू.६७७०० ते रू.२०८७००) | ०३ |
| ४. | अपर पोलीस अधीक्षक | S-२३ - (रू.६७७०० ते रू.२०८७००) | ०३ |
| ५. | पोलीस उप अधीक्षक | S-२० - (रू.५६१०० ते रू.१७७५००) | १० |
| ६. | पोलीस निरीक्षक | S-१८ - (रू.४९१०० ते रू.१५५८००) | १५ |
| ७. | सहायक पोलीस निरीक्षक | S-१५ - (रू.४१८०० ते रू.१३२३००) | १५ |
| ८. | पोलीस उप निरीक्षक | S-१४ - (रू.३८६०० ते रू.१२२८००) | २० |
| ९. | सहायक पोलीस उप निरीक्षक | S-१० - (रू.२९२०० ते रू.९२३००) | ३५ |
| १०. | पोलीस हवालदार | S-९ - (रू.२६४०० ते रू.८३६००) | ४८ |
| ११. | पोलीस शिपाई | S-७ - (रू.२१७०० ते रू.६९१००) | ८३ |
| १२. | चालक पोलीस हवालदार | S-९ - (रू.२६४०० ते रू.८३६००) | १८ |
| १३ | चालक पोलीस शिपाई | S-७ - (रू.२१७०० ते रू.६९१००) | ३२ |
| १४ | कार्यालय अधीक्षक | S-१४ - (रू.३८६०० ते रू.१२२८००) | ०१ |
| १५ | प्रमुख लिपीक | S-१३ - (रू.३५४०० ते रू.११२४००) | ०२ |
| १६ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | S-८ - (रू.२५५०० ते रू.८११००) | ११ |
| १७ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | S-६ - (रू.१९९०० ते रू.६३२००) | ०७ |
| १८ | उच्चश्रेणी लघुलेखक | S-१६ - (रू.४४९०० ते रू.१४२४००) | ०२ |
| १९ | निम्नश्रेणी लघुलेखक | S-१५ - (रू.४१८०० ते रू.१३२३००) | ०३ |
| एकूण पदे - | | | ३१० |

## परिशिष्ट-ब ( बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाची पदे )

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | आवश्यक पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | फॉरेन्सीक तज्ञ (वैज्ञानीक सहायक) | S-१३ - (रू.३५४०० ते रू.११२४००) | ०३ |
| २. | विधि अधिकारी | S-१६ - (रू.४४९०० ते रू.१४२४००) | ०३ |
| ३. | कार्यालयीन शिपाई | S- १ - (रू.१५००० ते रू.४७६००) | १८ |
| ४. | सफाईगार | S- १ - (रू.१५००० ते रू.४७६००) | १२ |
| एकूण पदे - | | | ३६ |

*****